DAY — 12 SEAT NUMBER

2020	III	05	1100	J-399	(M)

ECONOMICS (49)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 80

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
(२) आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके / आकृत्या काढा.
(३) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
(४) सर्व मुख्य प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.

प्र. १. (अ) प्रश्नांखाली कंसात दिलेल्या पर्यायांतील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (५) [१६]

(१) सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे ----- समतोलाचा दृष्टिकोन होय.

(आंशिक / सर्वसाधारण / एकूण / बहुचलीय)

(२) कनिष्ठ वस्तूंसाठी मागणीची उत्पन्न लवचिकता ----- असते.

(सकारात्मक / नकारात्मक / शून्य / एकापेक्षा जास्त)

(३) सरकारने केलेली गुंतवणूक ----- गुंतवणूक होय.

(प्रेरित / स्वायत्त / स्थूल / अनियोजित)

(४) ----- हे व्यापारी बँकांचे प्राथमिक कार्य आहे.

(रोख्यांची खरेदी-विक्री / ठेवी स्वीकारणे / सुरक्षा कप्पा / पतपत्र देणे)

(५) सरकारी महसूल सरकारी खर्चापेक्षा जास्त असेल, तर त्याला ------- अंदाजपत्रक म्हणतात.

(शिलकीचे / समतोल / तुटीचे / असमतोल)

https://www.maharashtrastudy.com

(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा :

'अ' गट	'ब' गट
(अ) पेन व शाई	(१) घटक खर्चानुसार पद्धत
(ब) पूर्ण लवचिक पुरवठा	(२) नफा
(क) संयोजकाचा मोबदला	(३) संयुक्त मागणी
(ड) उत्पन्न पद्धत	(४) व्याज
(इ) पतनियंत्रण	(५) आडवा पुरवठा वक्र
	(६) व्यापारी बँक
	(७) उभा पुरवठा वक्र
	(८) मध्यवर्ती बँक

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (६)

(१) चैनीच्या वस्तूंची मागणी लवचिक असते.

(२) पुरवठा व किंमत यांच्यात अप्रत्यक्ष (indirect) संबंध असतो.

(३) पूर्ण स्पर्धेत वस्तू एकजिनशी नसतात.

(४) पैशाच्या मदतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे शक्य होते.

(५) व्यापारी बँका आधुनिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत.

(६) मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांचा अंतिम ऋणदाता म्हणून कार्य करीत नाही.

(अ) खालील संज्ञांच्या व्याख्या लिहा 'किंवा' त्यांच्या संकल्पना स्पष्ट करा [१२]
(कोणत्याही तीन) : (६)

(१) सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र

(२) सीमांत खर्च

(३) नैसर्गिक मक्तेदारी

(४) संयोजक

(५) सर्वसाधारण समतोल

(६) निरसन केंद्र

https://www.maharashtrastudy.com

(ब) खालील विधानांची कारणे द्या 'किंवा' विधाने स्पष्ट करा (कोणतीही तीन) : (६)

(१) सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र हे मूल्यसिद्धांत म्हणूनही ओळखले जाते.

(२) उपयोगिता नैतिकदृष्ट्या तटस्थ असते.

(३) जीवनावश्यक वस्तूंची मागणी अलवचिक असते.

(४) निवृत्ती वेतन हे हस्तांतरित उत्पन्न होय.

(५) बचत हे उत्पन्नाचे फलन आहे.

(६) सरकारची बँक म्हणून मध्यवर्ती बँक सरकारचा निधी हस्तांतरित करते.

https://www.maharashtrastudy.com

प्र. ३. (अ) खालील संज्ञांमधील फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (६) [१२]

(१) वैयक्तिक मागणी व बाजार मागणी

(२) पुरवठ्याचा विस्तार व पुरवठ्याचा संकोच

(३) विभाजन पद्धत व राशी पद्धत

(४) वैयक्तिक उत्पन्न व व्ययशक्य उत्पन्न

(५) पूर्ण वजनाची (full bodied) नाणी व गौण (token) नाणी

(६) प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर

(ब) संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही दोन) : (६)

(१) सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व

(२) मागणीची किंमत लवचिकता मोजण्याची भौमितिक पद्धती

(३) शुद्ध स्पर्धेची वैशिष्ट्ये

(४) संयोजकाचे गुण

प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतीही तीन) : [१२]

(१) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत स्पष्ट करा.

(२) मक्तेदारीयुक्त स्पर्धेची वैशिष्ट्ये लिहा.

(३) समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती (scope) व अभ्यासविषय स्पष्ट करा.

(४) उपभोग फलनावर परिणाम करणारे व्यक्तिनिष्ठ घटक स्पष्ट करा.

(५) कर्जाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

(६) भांडवली अंदाजपत्रकाचे भांडवली प्राप्ती आणि भांडवली खर्च हे भाग स्पष्ट करा.

https://www.maharashtrastudy.com

प्र. ५. खालील विधानांशी आपण सहमत 'आहात' किंवा 'नाहीत' ते सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) :

(१) उपयोगितेची अनेक वैशिष्ट्ये आहेत

(२) वस्तूच्या मागणीवर अनेक घटक परिणाम करतात.

(३) पुरवठा नियमाला कोणतेही अपवाद नाहीत.

(४) पैशाची अनेक दुय्यम कार्ये आहेत.

(५) व्यापारी बँका अनेक प्रकारची सामान्य उपयोगी कार्ये पार पाडतात.

(६) मध्यवर्ती बँक ही बँकांची बँक म्हणून कार्य करत नाही.

प्र. ६. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतीही दोन) : [१६]

(१) 'मागणीचा नियम' त्याच्या गृहीतांसह स्पष्ट करा.

(२) 'मागणीची लवचिकता' म्हणजे काय? मागणीच्या लवचिकतेचे प्रकार स्पष्ट करा.

(३) 'राष्ट्रीय उत्पन्न' म्हणजे काय? राष्ट्रीय उत्पन्नाच्या गणनेतील सैद्धांतिक अडचणी स्पष्ट करा.

(४) 'समग्र पुरवठा' म्हणजे काय? समग्र पुरवठा निर्धारित करणारे घटक स्पष्ट करा.

◆◆◆

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से